सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ५/०२/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे पत्र क्र.एचडीओ-०७२४/प्र.क्र.१४८/आस्था-१,दि.११/०७/२०२४

**विषय :-** विधिविधानाचे कामकाज (विधेयके/अध्यादेश) आणि दुय्यम विधिविधानाचे कामकाज करण्याच्या कार्यपध्दतीचे नियम.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे पत्र क्र.एचडीओ-०७२४/प्र.क्र.१४८/आस्था-१,दि.११/०७/२०२४ च्या पत्रात सोबत विधि व न्याय विभागाचे क्र.सचिव/विधि विधान,/२०२४/०२,दि.११/०६/२०२४ रोजीचे पत्र या कार्यालयात दि.२२/०१/२०२५ रोजी प्राप्त झाले असून सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

२. तरी, सदर शासन पत्रानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना / आर्थिक गुन्हे / नियोजन व समन्वय / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / लोहमार्ग / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / रा.रा.पो.बल ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर सुरक्षा / नागरी हक्क संरक्षण / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग / व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था/प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).



Scanned with CamScanner

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / धोरण / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी का .क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

प्रत सविनय सादर

महाराष्ट्र शासन गृह विभाग नवीन प्रशासन भवन,१२ वा मजला मादाम कामा मार्ग,राजगुरु चौक मंत्रालय,मुं.-३२
(लक्षवेधः- मुं.द.भरोसे, कक्ष अधिकारी,गृह विभाग)



Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
नवीन प्रशासन भवन, १२ वा मजला,
मादाम कामा मार्ग, राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क. २२०२८१६६ Email ID: home_hdo1@maharashtra.gov.in

क्रमांक : एचडीओ-०७२४/प्र.क्र.१४८/आस्था-१ दिनांक - ११ जुले, २०२४.

प्रति,

सर्व सह सचिव / उप सचिव,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

**विषय :- विधिविधानाचे कामकाज (विधेयके / अध्यादेश) आणि दुय्यम विधिविधानाचे कामकाज करण्याच्या कार्यपध्दतीचे नियम.**

महोदय,

उपरोक्त विषयावरील विधि व न्याय विभागाचे क्र. सचिव/विधि विधान/२०२४/०२, दिनांक ११.०६.२०२४ रोजीचे पत्र यासोबत जोडले आहे. कृपया अवलोकन व्हावे.

२. विधि व न्याय विभागाच्या वरील दिनांक ११.०६.२०२४ रोजीच्या पत्रात नमूद केल्यानुसार, विधि विधानाच्या कामकाजाबाबतचे नियम तयार करुन त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२३ रोजी निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२३११०६१४४८११०११२ असा आहे. सदर शासन निर्णयामध्ये Rules of procedure for dealing Legislation work (Bills / Ordinances) and Subordinate Legislation work (In English and Marathi) उपलब्ध करुन दिलेले आहे. सदर शासन निर्णयानुसार विधि विधानाच्या कामकाज करणे अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

( मुं. उ. भरोसे )
कक्ष अधिकारी, गृह विभाग

सोबत :- वरील प्रमाणे.

प्रत, सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned with CamScanner

**विधिविधानाचे कामकाज (विधेयके /अध्यादेश) आणि दुय्यम विधिविधानचे कामकाज करण्याच्या कार्यपद्धतीचे नियम.**

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग, विधिविधान शाखा,**
**शासन निर्णय क्रमांक. एलईजी २०२३/बी-५९४,**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक ६ नोव्हेंबर २०२३.

**शासन निर्णय**

<u>प्रस्तावना</u> :-

मंत्रालयातील प्रशासकीय विभाग, महाराष्ट्र शासन कामकाज नियमावली प्रमाणे त्यांना नेमून दिलेल्या विषयांनुसार त्या त्या विभागाशी संबंधित असणाऱ्या विविध अधिनियमांची अंमलबजावणी करतात. वैधानिक प्रस्तावांची कायदेशीर व संविधानिक व्यवहार्यता तपासण्यासाठी आणि विधेयके, अध्यादेश यांचा मसुदा तयार करण्यासाठी आणि अधिसुचना, नियम, आदेश इत्यादी यांची छाननी करण्यासाठी ते विभाग, विधि व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठवितात. सर्व विधिविधान आणि दुय्यम विधिविधानाचे प्रस्ताव विधि व न्याय विभागाच्या विधिविधान शाखेकडून तपासून दिले जातात.

२. विधिविधान व दुय्यम विधिविधानामार्फत शासनाची विविध धोरणात्मक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विधि व न्याय विभागातील विधिविधान शाखेची महत्वाची भूमिका असते. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व राज्य विधानमंडळ यांच्या विधिविधानासंबंधी कामकाजामध्ये दुवा साधण्याचे काम विधिविधान शाखा करते. प्रत्येक विधिविधानाचे काम विविध टप्प्यांमधून जाते. सभागृहात विधेयक सादर करण्यापूर्वी आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी विधेयक संमत केल्यानंतर विधिविधान शाखेच्या अधिकाऱ्यांना विवक्षित कार्यपद्धतीचे अनुसरण करावे लागते. विधिविधान व दुय्यम विधिविधान यांच्या संस्करण प्रक्रियेमध्ये, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची देखील महत्त्वाची भूमिका असते आणि त्यांना देखील विवक्षित कार्यपद्धतीचे अनुसरण करावे लागते.

३. विधिविधानाचा व दुय्यम विधि विधानाचा मसुदा तयार करण्यासाठी विशेषज्ञता, अनुभव, कामातील समर्पण आणि प्रशिक्षित व तज्ञ प्रारूपकारांची उपलब्धता या गोष्टींची आवश्यकता असते. विधिविधानाचा मसुदा तयार करण्याचे काम हे, अत्यंत तांत्रिक, क्लिष्ट व प्रदीर्घ वेळ घेणारे स्वरूपाचे असते; म्हणून, त्यासाठी पुरेसा वेळ आवश्यक असतो. कायद्याचे ज्ञान असलेली कोणतीही व्यक्ती, विधिविधानाचा मसुदा तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव असल्याशिवाय सक्षम प्रारूपकार (Draftsman) होऊ शकत नाही. विधिविधानाचा मसुदा तयार करणे हे कायदेविषयक इतर मसुदे तयार करण्याच्या कामापेक्षा पूर्णपणे वेगळे काम आहे.

४. अनेकदा, मंत्रालयीन विभाग, घाईघाईने प्रस्ताव पाठवीत असतात आणि असे प्रस्ताव मोघम / अस्पष्ट स्वरूपाचे असतात. बहुतेक विधिविधानाचे प्रस्ताव अधिवेशन सुरू होण्याच्या अगदी काही दिवस आधी किंवा अधिवेशन सुरू असताना, विधि व न्याय विभागास प्राप्त होतात. अशा प्रकरणांमध्ये, विधिविधान शाखेला प्रस्तावांची सविस्तर तपासणी / छाननी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. विभागातील अधिकाऱ्यांची संख्या देखील फारच कमी असल्यामुळे अशा अल्प कालावधीमध्ये सर्व वैधानिक प्रस्ताव बारकाईने तपासणे व त्या प्रस्तावांचे कामकाज पूर्ण करणे शक्य होत नाही.

जर मंत्रालयीन विभागांकडून योग्य रीतीने, उचित कार्यपद्धतीचा अवलंब करून व वेळेत विधिविधानाचे प्रस्ताव तयार करण्यात आले नाही तर, विधिविधान शाखेच्या तसेच संबंधित प्रशासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांचा बराच अनावश्यक वेळ वाया जातो. वैधानिक प्रस्तावांची तपासणी करण्यासाठी आणि त्याचा मसुदा तयार करण्याकरिता विधिविधान शाखेतील अधिकाऱ्यांना खूप कमी वेळ मिळतो. अधिकाऱ्यांना, कमी वेळेमध्ये विधेयकांचे/अध्यादेशांचे मसुदे तयार करावे लागतात, त्यामुळे काही वेळा न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. एकदा कायदा झाल्यानंतर, विविध अंमलबजावणी प्राधिकरणे, अधिवक्ते, न्यायालये, नागरिक, इत्यादींकडून त्याचा अन्वयार्थ लावण्यात येतो, त्यामुळे, वैधानिक प्रस्तावांची सविस्तर तपासणी करणे आणि त्यांचा काळजीपूर्वक मसुदा तयार करणे आवश्यक असते आणि त्या प्रयोजनासाठी, सदर प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे विहित वेळेत पाठविले पाहिजेत.

५. विद्यमान अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी किंवा नवीन कायदा करण्यासाठी, मंत्रालयीन विभागांकडून, अध्यादेश प्रख्यापित करण्यासाठी किंवा महाराष्ट्र राज्य विधानमंडळामध्ये विधेयक सादर करण्यासाठीचे प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे पाठविले जातात. अनेकदा असे निदर्शनास आले आहे की, मंत्रालयीन विभागांना, विधिविधानाच्या प्रस्तावांवर व दुय्यम विधिविधानाच्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्याच्या उचित कार्यपद्धतीविषयी कोणतीही माहिती नसते. कायदा करून देखील, संबंधीत विभाग कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी अधिनियमाच्या तरतूदी अंमलात आणणे, प्राधिकाऱ्यांची नियुक्ती करणे, मंडळे घटित करणे, आवश्यक असलेल्या अधिसूचना काढणे, नियम तयार करणे, विनियम तयार करणे, इत्यादीं गोष्टींची कार्यवाही वेळेत करीत नाहीत. म्हणून, विधिविधानाचे प्रस्ताव व दुय्यम विधिविधानाचे प्रस्ताव यांच्या प्रक्रियेच्या कार्यपद्धतीचे (Legislation procedure) सविस्तर नियम मंत्रालयातील सर्व विभागातील अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या माहितीसाठी निर्गमित करणे आवश्यक आहे. नियम करण्याच्या उद्देश असा आहे की, मंत्रालयीन विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांना, विधिविधानाची कार्यपद्धती व टप्पे, विधिविधान प्रक्रिया व दुय्यम विधिविधानाचे काम करण्यासंबंधी त्यांची कर्तव्ये व दायित्वे यांची माहिती असणे आवश्यक आहे. प्रस्तावित नियमांमुळे शासकीय धोरणांची गुणवत्तापूर्वक व कालबद्धरीतीने अंमलबजावणी करण्यास मदत होईल.

**शासन निर्णय :-**

शासन धोरणांची गुणवत्तापूर्ण व कालबध्दरितीने अंमलबजावणी करण्यासाठी, विधि विधान कामकाज (विधेयक / अध्यादेश) आणि दुय्यम विधि विधान कामकाज हाताळण्याच्या दृष्टीने **विधिविधानाचे कामकाज (विधेयके/अध्यादेश) आणि दुय्यम विधिविधानाचे कामकाज करण्यासाठी** सोबतच्या जोडपत्रामधील नियम करण्यात येत आहेत.

६. उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या “www.maharashtra.gov.in” या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२३११०६१४४८११०११२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATISH BABAN WAGHOLE

Digitally signed by SATISH BABAN WAGHOLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=LAW AND JUDICIARY DEPARTMENT,
2.5.4.20=a8a564a8b86f10dd055a40390fac5e201097ebdc6d10d54485928bc2ca8562f4, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=4C1735DC74D982FD392B01D4C40FE989C2B0CAA52814EA95C856B28E1379DC21, cn=SATISH BABAN WAGHOLE
Date: 2023.11.06 14:49:04 +05'30'

**(सतीश वाघोले)**
**शासनाचे सचिव (विधिविधान),**
**विधि व न्याय विभाग.**

**प्रति,**

१) राज्यपालांचे सचिव,

२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

३) उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव,

४) उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव

५) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

६) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव,

७) सचिव, महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद, विधान भवन, मुंबई,

८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

९) भाषा संचालक, भाषा संचालनालय, मुंबई

१०) विधि विधान शाखेतील सर्व अधिकारी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.